131

# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य
डॉ.नायडू रुग्णालय आवार,पुणे-१

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५९५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
इ-मेल : crs_d83@yahoo.com

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/मृत्यु नोंदणी सुधारणा/8757-8781/२०१३,दिनांक :-5 ऑगस्ट २०१३

परिपत्रक

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक,जन्म-मृत्यु,
जिल्हा परिषद .................. (सर्व)

विषय :- मृत्यु नोंदणी मध्ये सुधारणा करणेबाबत...
(To improve the Registration of Death)

संदर्भ :- १) आपले पत्र क्र.संआसे/कक्ष१८/टे.नं६/४१३३/१३ दिनांक १८/५/२०१३
२) महानिबंधक, जन्म-मृत्यु, भारत सरकार नवी दिल्ली यांचे पत्र क्र.
No.11/7/2008-VS(CRS) Dated - 8/3/2013.

राज्यात केंद्रशासनाच्या जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र राज्य जन्म-मृत्यु नोंदणी नियम २००० मधील तरतुदींनुसार जन्म-मृत्यु घटनांची नोंदणी नियमितपणे करणे बंधनकारक आहे.

१) मृत्यु नोंदणी बंधनकारक असूनही राज्यात घरी होणारे मृत्यु तसेच अर्भक व माता मृत्यु यांच्या नोंदणीचे प्रमाण कमी असल्याने राष्ट्रीय पातळीवर मृत्यु नोंदणीचे प्रमाण कमी असून हे फक्त ६७ टक्के असल्याचे महानिबंधक, जन्म-मृत्यु, भारत सरकार नवी दिल्ली यांनी त्यांचे दिनांक ८.३.२०१३ च्या पत्रात नमूद केले आहे. (सोबत प्रत)

२) राष्ट्रीय पातळीवर मुख्य निबंधक जन्म-मृत्यु यांच्या दिनांक ५ व ६ मार्च २००९ यांचे बैठकित सुचविलेल्या मुद्दा क्र.२.३ मध्ये मृत्यु नोंदीत वाढ करण्यासाठी आपल्या कार्यक्षेत्रात मृत्यु झालेल्या परंतु मृत्यु नोंदणी न झालेल्या घटनांची नोंद करण्यासाठी भर देण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

३) नोंद न होत असलेल्या मृत्युचा शोध घेण्यासाठी स्मशान भुमी/दफन भुमी येथील प्रभारी व्यक्ती/ तेथील काळजी घेणारा कर्मचारी यांना अधिसुचक म्हणून जबाबदारी देण्यात यावी. तसेच त्यांना मृत्यु हा घरी अथवा दवाखान्यात झाला आहे. तसेच मृत्युचे ठिकाण इत्यादी माहिती बिनचुक भरण्याच्या सुचना सुध्दा देण्यात याव्यात.

वरील सुचना शहरी भागातील सर्व निबंधकांना आपल्या स्तरावरुन निर्गमित कराव्यात.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

प्रत माहितीसाठी सादर :- १) मा. महानिबंधक, जन्म-मृत्यु, भारत सरकार जीवनांक प्रभाग, पश्चिमी खंड-१, रामकृष्ण पुरम, नई दिल्ली-११००६६.
२) मा. संचालक, आरोग्य सेवा, महराष्ट्र राज्य मुंबई
२) आपले पत्र क्र संआसे/कक्ष १८/टे नं ६/ ४१३३/१३ दि १८/५/२०१३ च्या अनुषंगाने

E:\83\Circular.doc